दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सिंहस्थ कुंभमेळ्याचे खास निमंत्रण !

नाशिक : नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. येत्या ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या या सोहळ्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना औपचारिक निमंत्रण देण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह राज्यातील मंत्री आणि पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने राष्ट्रपती भवन येथे भेट घेऊन त्यांना निमंत्रण दिले.

उसनवारी नियुक्त्यांना चाप लावल्यानंतर मंत्री कार्यालयांत 'सावधि' पदांना मंजुरी!

मुंबई : मंत्री कार्यालयांतील उसनवारी आणि मौखिक नियुक्त्यांना चाप लावल्यानंतर निर्माण झालेली मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी राज्य शासनाने सावधि पदांच्या संख्येत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, मुख्यमंत्री सचिवालयात ४१, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यालयांत प्रत्येकी १८, तर कॅबिनेट मंत्री आणि राज्यमंत्र्यांच्या कार्यालयांत प्रत्येकी चार अतिरिक्त पदांना मंजुरी देण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. २२ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १७९ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

ओरिजिनओएस 7 सादर केले

नवी दिल्ली: विवो इंडियाने आज आपली नवीनतम ऑपरेटिंग सिस्टीम, ओरिजिनओएस ७ सादर केली, जी सुधारित कार्यक्षमता, इंटेलिजेंट उत्पादकता आणि अखंड कनेक्टिव्हिटीद्वारे प्रीमियम स्मार्टफोनचा अनुभव वाढवण्यासाठी डिझाइन केली आहे. 'सोपे', 'स्मार्ट' आणि 'कनेक्टेड' या तीन मुख्य अनुभवांवर आधारित, ओरिजिनओएस ७ सुधारित सिस्टीम कार्यक्षमता, एआय-शक्तीवर चालणारी उत्पादकता, क्रॉस-डिव्हाइस कनेक्टिव्हिटी, पर्सनलायझेशन आणि वर्धित सुरक्षा एकत्र आणते, जेणेकरून वापरकर्त्यांना त्यांच्या विवो स्मार्टफोनचा अधिक चांगला वापर करता येईल. ओरिजिनओएस ७ दैनंदिन वापरासाठी अधिक मजबूत पायावर सुरू होते.

ॲक्यूट लिव्हर फेल्युअर

नाशिक: यकृत (लिव्हर) हा मानवी शरीरातील सर्वात महत्त्वाच्या अवयवांपैकी एक आहे. रक्तातील विषारी घटक बाहेर काढणे, प्रथिनांची निर्मिती करणे, पचनक्रियेला मदत करणे आणि शरीरातील चयापचय नियंत्रित करणे अशी अनेक महत्त्वाची कार्ये यकृत पार पाडते. नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील लिव्हर अँड मल्टिऑर्गन ट्रान्सप्लांट विभागाचे संचालक डॉ. गौरव चौबल यांच्या मते, यकृताची सामान्य कार्ये करण्याची क्षमता वेगाने कमी होऊ लागते, तेव्हा ॲक्यूट लिव्हर फेल्युअरची स्थिती निर्माण होते.

पेमेंट ॲप्स बनले आर्थिक सोबती

बेंगळुरू: पहले इंडिया फाउंडेशनने आज ॲमेझॉन पेसोबत सहयोगाने 'हाऊ अर्बन इंडिया पेज रिपोर्ट २०२६' प्रसिद्ध केला. २० राज्यांमधील १०० शहरांतील ५,१४९ ग्राहक आणि १,०५४ व्यापाऱ्यांच्या सर्वेक्षणावर आधारित या अहवालातून निदर्शनास आले आहे की, डिजिटल पेमेंट्स दैनंदिन सवय बनली आहे आणि खर्चाच्या सहापैकी पाच श्रेणींमध्ये यूपीआय आघाडीवर आहे. अहवालात डिजिटल क्रेडिट इन्क्लुजन इंडेक्स (डीसीआयआय) २०२६ सादर करण्यात आला आहे, जो देशाच्या डिजिटल क्रेडिट प्रवासाचा सर्वसमावेशक दृष्टिकोन मांडणारा भारताचा पहिला संमिश्र बेंचमार्क आहे. हा निर्देशांक भारताला १०० पैकी ५५.८५ एकूण स्कोअर देतो, ज्यामुळे भारत "इमर्जिंग अँड सक्व्र्ड" (५१ ते ७५) श्रेणीत येतो.

नॉर्डिट्रॉपिन च्या किमतीत 35% कपात

बेंगळुरू - ग्रोथ हार्मोनची कमतरता असलेल्या भारतातील लहान मुलांसाठी आणि प्रौढांसाठी नोव्हो इंडियाने आज नॉर्डिट्रॉपिन® फ्लेक्सप्रो® च्या किमतीत 35% पर्यंत मोठी कपात जाहीर केली आहे. आजपासून लागू होणाऱ्या या निर्णयानुसार, हे नाविन्यपूर्ण ग्रोथ हार्मोन थेरपी औषध दोन वेगवेगळ्या डोस क्षमतांमध्ये – 10 मिग्रॅ आणि 15 मिग्रॅ - भारत-केंद्रित नवीन किमतींमध्ये उपलब्ध होईल.भारतात वाढीच्या समस्या असलेल्या लोकांना आवश्यक उपचार सहज आणि कमी खर्चात मिळावेत, यासाठी नोव्होने उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. हे पाऊल नोव्होच्या कटिबद्धतेचा एक भाग आहे.

संयुक्त उपक्रमासाठी सामंजस्य करार

नवी दिल्ली: अदाणी समूहाची प्रमुख कंपनी अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेड (एईएल) आणि जागतिक अभियांत्रिकी, पुरवठा साखळी व उत्पादन क्षेत्रातील कंपनी जॅबिल आयएनसी. (एनवायएसई / जेबीएल) यांनी भारतात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा सेंटर उपकरणांचे उत्पादन व असेंब्ली करण्यासाठी प्रस्तावित ५०|५० संयुक्त उपक्रमाची रूपरेषा निश्चित करणाऱ्या बंधनकारक नसलेल्या सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

'सौर संवाद 2026' यात्रेचे अहिल्यानगरमध्ये उद्घाटन

पुणे : सौर ऊर्जेबाबत जनजागृती आणि उद्योजकता व रोजगाराच्या संधी ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यासाठी गोपाल काबरा फाऊंडेशन आणि जीके एनर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सौर संवाद २०२६' यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. १२ ते १८ ऑक्टोबरदरम्यान ही यात्रा महाराष्ट्रातील १४ शहरांतून जाणार आहे. एक हजारांहून अधिक इच्छुक उद्योजकांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट आहे.

श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यानाची जागा जालना मनपाच्या ताब्यात

जनसंघाच्या 75 व्या स्थापना वर्षानिमित्त भाजपाची भव्य रॅली; दानवे, लोणीकर, सुनील राणे यांची उपस्थिती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

जालना : डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यानाची जागा अखेर जालना महानगरपालिकेच्या ताब्यात आली असून, त्यामुळे उद्यानाच्या रखडलेल्या विकासकामांचा मार्ग मोकळा झाला आहे. भारतीय जनसंघाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भारतीय जनता पार्टी, जालना महानगरच्या वतीने बुधवारी (दि. २१ ऑक्टोबर) शहरात भव्य रॅली आणि जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

वीर सावरकर चौक येथून फुलंब्रीकर नाट्यगृहापर्यंत काढण्यात आलेल्या रॅलीत भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. रॅलीच्या समारोपानंतर डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. 'एक देश में दो प्रधान, दो निशान और दो विधान नहीं चलेंगे' या त्यांच्या ऐतिहासिक घोषणेचे स्मरण करून त्यांच्या राष्ट्रनिष्ठ विचारांना उजाळा देण्यात आला.



यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी देशाच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान आणि जनसंघाच्या माध्यमातून मांडलेले विचार आजही मार्गदर्शक आहेत. याच विचारांच्या आधारावर भाजपाने देशभरात संघटन उभे केले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या प्रगतीसाठी काम सुरू आहे.

माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, डॉ. मुखर्जी यांनी रुजवलेल्या विचारधारेच्या बळावर भाजपाने देशभरात संघटन मजबूत केले. जनसंघाचा ७५ वर्षांचा प्रवास प्रत्येक कार्यकर्त्यासाठी अभिमानाची बाब आहे.

भाजपाचे प्रदेश सरचिटणीस सुनील राणे म्हणाले की, भविष्यात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा जालन्यातील त्यांच्या स्मारकाचा आवर्जून उल्लेख होईल. हे स्मारक त्यांच्या राष्ट्रासाठीच्या योगदानाची आणि विचारांची आठवण करून देणारे ठरेल.

उद्यानाची जागा अनेक वर्षांपासून वादात अडकली होती. आता ती महानगरपालिकेच्या ताब्यात आल्याने विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा आहे. या जागेसाठी सातत्याने प्रयत्न करणारे नगरसेवक वीरेंद्र धोका यांचे उपस्थितांनी अभिनंदन केले.

कार्यक्रमाला रावसाहेब पाटील दानवे, आमदार बबनराव लोणीकर, सुनील राणे, आमदार नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, भाजपाचे जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, राहुल भैया लोणीकर, मराठवाडा संयोजक नितीन काळे, किरण पाटील, धनंजय कुलकर्णी, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, रामेश्वर भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, सुनील पवार, संगीताताई गोरंट्याल यांच्यासह भाजपाचे नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन नगरसेवक वीरेंद्र धोका यांनी केले होते.

शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये अनुदान देण्यासाठी काँग्रेस आक्रमक

'वोट बचाओ, देश बचाओ' अभियानांतर्गत कळमनुरीत काँग्रेसचा मोर्चा

मुख्य निवडणूक आयोगाचे ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याचीही मागणी

हिंगोली :अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती आणि शेतीच्या नुकसानीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये अनुदान द्यावे, शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी, तसेच हळद उत्पादक शेतकऱ्यांना पीकविम्याची नुकसानभरपाई तातडीने द्यावी, यासह विविध मागण्यांसाठी जिल्हा व कळमनुरी तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने २१ ऑक्टोबर रोजी कळमनुरी येथे मोर्चा काढण्यात आला. 'वोट बचाओ, देश बचाओ' अभियानांतर्गत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणीही यावेळी करण्यात आली.



शहरातील लमानदेव परिसरातून या मोर्चाला सुरुवात झाली. मुख्य रस्त्यावरून तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात आलेल्या या मोर्चात काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शेतकरी व नागरिक सहभागी झाले होते. यावेळी केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात विविध घोषणाबाजी करून शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्याची मागणी

अतिवृष्टी आणि नैसर्गिक आपत्तींमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. उत्पादनात घट, पिकांचे नुकसान आणि वाढता आर्थिक ताण लक्षात घेता बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर हेक्टरी एक लाख रुपये अनुदान तातडीने जमा करावे, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. तसेच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कोणत्याही अटीशिवाय सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

कळमनुरी तालुक्यासह परिसरात हळद उत्पादक शेतकऱ्यांना पीक नुकसानीचा सामना करावा लागत असल्याने संबंधित शेतकऱ्यांना पीकविम्याची नुकसानभरपाई विलंब न करता द्यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

वोट बचाओ, देश बचाओ' अभियानाचा मुद्दाही ऐरणीवर

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसोबतच 'वोट बचाओ, देश बचाओ' अभियानांतर्गत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेशी संबंधित मुद्द्यांकडे लक्ष वेधत विविध मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या मोर्चाच्या माध्यमातून करण्यात आला. मोर्चानंतर विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना सादर करण्यात आले. शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत, सरसकट कर्जमाफी आणि पीकविम्याची भरपाई देण्याबाबत शासनाने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या मोर्चात काँग्रेसचे मराठवाडा प्रभारी रेहानाजी चिश्ती डॉ. स्मिता शहापूरकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ सतीश पाचपुते प्रदेश सचिव प्रा साहेबराव देवकते अल्पसख्यांक विभाग मराठवाडा अध्यक्ष अब्दुल हाफिज माजी जिल्हाध्यक्ष सुरेश आप्पा सराफ ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष भास्कररराव पोले नाईक जकी कुरेशी, डॉ. रमेश शिंदे महिला काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस सीमा हाफिज औंढा नागनाथ तालुकाध्यक्ष एडवोकेट प्रदीप नाईक, सेनगाव तालुकाध्यक्ष डॉ निळकंठ गडदे नगरसेवक बाबा भाई विनायक देशमुख शामराव जगताप युवक काँग्रेस प्रदेश सचिव बंटी नागरे दत्तराव जाधव आदींसह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

पदवीधर, शिक्षक मतदारसंघांतील प्रचारतोफा उद्या थंडावणार, 23 ऑक्टोबरला मतदान

पाच जागांसाठी 182 उमेदवार रिंगणात, 27 ला मतमोजणी

मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांतील द्विवार्षिक निवडणुकीच्या प्रचाराची मुदत गुरुवारी संपत आहे. छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि नागपूर विभागांतील पदवीधर, तसेच अमरावती आणि पुणे विभागांतील शिक्षक मतदारसंघांसाठी शुक्रवारी, २३ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. पाच जागांसाठी एकूण १८२ उमेदवार रिंगणात असून, १० लाख ६८ हजार ७२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदानासाठी २ हजार ४१९ केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. मंगळवारी, २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार असून, ३१ ऑक्टोबरपर्यंत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

या पाचही मतदारसंघांतील विद्यमान सदस्यांची मुदत ६ डिसेंबर २०२६ रोजी संपत असल्याने केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार निवडणूक होत आहे. मतदानाची प्रक्रिया सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत पार पडणार आहे. निवडणूक निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. पाच जागांसाठी एकूण १८२ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघात ४१, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात ४७ आणि नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ३८ उमेदवार रिंगणात आहेत. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात २६, तर पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात ३० उमेदवार निवडणूक लढवत आहेत. पाचही मतदारसंघांमध्ये पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ४७ उमेदवार असल्याने या मतदारसंघातील लढतीकडे लक्ष लागले आहे.

पाचही मतदारसंघांत मिळून १० लाख ६८ हजार ७२ मतदारांची नोंदणी झाली आहे. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ३ लाख ८८ हजार १९ मतदार आहेत. याउलट, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात सर्वात कमी ३५ हजार ८१० मतदार आहेत.

टायगर श्रॉफवरील हल्ल्याप्रकरणी तिन्ही आरोपींना 31 ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी

मुंबई: अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी तीन मुख्य आरोपींना मुंबई न्यायालयाने 31 ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपींना 19 ऑक्टोबर रोजी राजस्थानातील कोटा येथून मुंबईत आणण्यात आले होते. अटक करण्यात आलेल्या व्यक्तींमध्ये हरियाणातील सोनिपत येथील रेहान उर्फ सुक्का, मूळचा बिहारमधील बेगुसराईचा आणि मुंबईत राहणारा हृतिक कुर्मी उर्फ रोशन आणि हरियाणातील फुल सिंग यांचा समावेश आहे. गुन्हे शाखेने या तिन्ही आरोपींना दंडाधिकारी न्यायालयात हजर करून पोलीस कोठडीची मागणी केली. गुन्ह्यात वापरलेली शस्त्रे हस्तगत करायची आहेत, असे तपास यंत्रणेने न्यायालयाला सांगितले आणि आरोपीने दोन फोन नष्ट केल्याचा आरोप केला. घटनेमागील कट आणि हेतू उघडकीस आणण्यासाठी कोठडी आवश्यक होती, असे पोलिसांनी एका वृत्तसंस्थेस सांगितले. तिघांच्या पोलीस कोठडीला त्यांचे बचाव वकील अजिंक्य मिर्गल आणि सत्यव्रत जोशी यांनी विरोध केला.

शस्त्रे जप्त करण्यासाठी कोठडीची आवश्यकता नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. त्यांनी आपल्या निवेदनात हेदेखील अधोरेखित केले की, आरोपी ट्रान्झिट रिमांडवर असताना त्यांची चौकशी करण्यात आली होती. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून आरोपींना 31 ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

रविवारी (18 ऑक्टोबर) संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर गोळीबार झाला. ही घटना जुहू येथील पुष्पा पार्क परिसरात घडली.

दसऱ्याच्या तोंडावर झेंडूला कवडीमोल भाव, तरीही गिऱ्हाईक गायब!

अंधारी | वार्ताहर : दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर घर, गाड्या आणि दुकानांना तोरण लावण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या झेंडूच्या फुलांनी यंदा शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आणले आहेत. एकीकडे दुष्काळाच्या झळा आणि निसर्गाची अवकृपा सहन करत शेतकऱ्यांनी डोक्यावर पाणी वाहून झेंडूची बाग फुलवली; मात्र, दसऱ्याच्या दिवशी बाजारात झेंडूला अत्यंत कवडीमोल भाव मिळत आहे. अत्यंत दयनीय परिस्थिती म्हणजे आपट्याची आणि आंब्याची पाने ज्या दराने विकली जात आहेत, त्यापेक्षाही कमी किंमत झेंडूच्या फुलांना मिळत असूनसुद्धा बाजारात ग्राहक फिरकेनासे झाले आहेत.



दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर आज सकाळपासूनच शेतकरी गाड्या भरून झेंडूची फुले बाजारात घेऊन आले होते. रस्त्याच्या दुतर्फा झेंडूच्या पिवळ्या आणि नारंगी रंगाच्या राशी पसरलेल्या दिसत आहेत. मात्र, बाजारात अपेक्षित गर्दी नसल्यामुळे आणि आलेल्या ग्राहकांकडून अत्यंत कमी दर मागितला जात असल्यामुळे व्यापारी व शेतकरी दोघेही अडचणीत आले आहेत.

दसरा सणात आपट्याची पाने (सोने) आणि तोरणासाठी आंब्याच्या पानांना विशेष महत्त्व असते. यंदा दुष्काळामुळे पानांची टंचाई असल्याने १० ते २० रुपयांना चार-पाच पाने विकली जात आहेत. दुसरीकडे मेहनत करून पिकवलेला झेंडू मात्र १० ते २० रुपये किलो दरानेही कुणी घ्यायला तयार नाही. लागवडीचा खर्च, वाहतूक आणि तोडणीचा मजुरी खर्चही निघणे कठीण झाल्याचे चित्र आहे. "पावसाने मार दिल्याने दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. कसेबसे पाणी देऊन झेंडू पिकवला, पण बाजारात आल्यावर फुलांचे दर पार कोसळले आहेत. गिऱ्हाईक नसल्याने आणलेला माल तसाच पडून आहे. सण कसा साजरा करायचा, हाच मोठा प्रश्न आहे."

बळीराजाची दिवाळी अंधारात जाण्याची भीती

दरवर्षी दसरा आणि दिवाळीच्या काळात फुलशेतीतून चार पैसे हाती मिळतील या आशेने शेतकरी झेंडूची लागवड करतात. परंतु, यंदा बाजारातील मंदी आणि घसरलेल्या दरांमुळे बळीराजाचा दसऱ्याचा सण कडू झाला असून, आगामी दिवाळी कशी साजरी करायची, असा गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे.

"शाल जोडे"



पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची जलसंधारणाची विशेष मोहीम ! पहिला टप्पा प्रशासनाचा

31 ऑक्टोबरपर्यंत स्वमालकीच्या विहिरी, बोअरवेलच्या पुनर्भरणाची कामे करा

राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे परभणी जिल्हाधिकारी यांना निर्देश

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: जिल्ह्यातील सर्व ठिकाणी पाणीटंचाई, भूजल पातळीतील घट आणि पर्जन्यमानातील अनिश्चितता लक्षात घेता, पावसाच्या पाण्याचे संधारण व भूजल पुनर्भरणाला चालना देण्यासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सहभागातून विशेष जलसंधारण मोहीम राबवावी. तसेच सर्व कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या शासकीय कार्यालयांच्या परिसरात जलतारा शोषखड्डे घेण्यात यावेत, असे निर्देश राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी परभणी जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे दिले आहेत. जलसंधारण कामांचा हा जिल्ह्यातील पहिला टप्पा असून पुढील टप्प्यात या मोहिमेत सर्वसामान्यांना सहभागी करून घेतले जाणार असल्याची माहिती राज्यमंत्री मेघना साकोरे - बोर्डीकर यांच्या वतीने देण्यात आली आहे.

या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या स्वमालकीच्या निवासस्थानी, शेतजमिनीवर किंवा अन्य मालकीच्या जागेवरील बोअरवेल, विहिरी, शेतविहिरी आणि इतर



जलस्रोतांचे पुनर्भरण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. तसेच पावसाचे पाणी अडविणे आणि जमिनीत मुरविण्यासाठी जलसंधारणाची कामे हाती घ्यावीत. ही कार्यवाही ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पावसाचे पाणी संकलित करून बोअरवेल व विहिरींचे पुनर्भरण करणे, छतावरील पावसाचे पाणी साठविणे, पाणी जमिनीत मुरविण्यासाठी सोक पिट व पुनर्भरण खड्डे तयार करणे, तसेच जलतारा शोषखड्डे आणि स्थानिक परिस्थितीनुसार अन्य योग्य जलसंधारणाची कामे करण्यावर भर देण्यात यावा.

या कामांचे जिओ टॅग छायाचित्रांसह दस्तऐवजीकरण करणे आवश्यक असून, संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्याचे नाव, पदनाम, कार्यालय, गाव, जलस्रोताचा प्रकार आणि केलेल्या कामाचा तपशील यांसह अनुपालन अहवाल तयार करण्यात यावा. अधिकारी आणि कर्मचारी जिथे काम करतात त्या कार्यालय परिसरात कार्यालय प्रमुखांनी जलतारा शोषखड्डे घेणे बंधनकारक असून प्रत्येक शासकीय कार्यालय प्रमुख सक्षम अधिकारी किंवा नोडल अधिकाऱ्याने माहिती संकलित करून विभागनिहाय कामांचा आढावा घ्यावा. सर्व विभागांनी आपल्या कार्यालयाचा एकत्रित अहवाल १ नोव्हेंबर २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा, असेही निर्देश पत्रात देण्यात आले आहेत.

या मोहिमेत उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामगिरीची विशेष दखल घेऊन त्यांना योग्य प्रसिद्धी देण्यात यावी, असे निर्देशही राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले आहेत.

शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून भूजल पुनर्भरणाला चालना मिळण्याबरोबरच उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन होईल आणि समाजात जलसंधारणाविषयी

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सं पा द की य

राज ठाकरेंची आक्रमक भूमिका आणि बॅलेट पेपरचा मुद्दा

महाराष्ट्राच्या राजकारणात दसरा मेळाव्यांच्या निमित्ताने राजकीय तोफा धडाडत असतानाच, मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी घेतलेली आक्रमक भूमिका आणि केलेली विधाने सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहेत. शिवसेना (उबाठा) खासदार संजय राऊत यांच्या विधानांना दुजोरा देत राज ठाकरे यांनी आगामी काळात देशात मोठे राजकीय फेरबदल होण्याचे संकेत दिले आहेत. निवडणुका ईव्हीएमऐवजी पुन्हा 'बॅलेट पेपर'वरच घेण्यात याव्यात, ही त्यांची जुनीच मागणी नव्याने लावून धरतानाच त्यांनी निवडणूक प्रणाली, स्वायत्त संस्था, प्रसारमाध्यमे आणि केंद्र सरकारच्या कारभारावर कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत. सत्तेचा अमरपट्टा कोणीही घेऊन आलेले नाही आणि बदल हा लोकशाहीचा नियम आहे, हे त्यांचे परखड विचार राज्याच्या व देशाच्या राजकारणाला नवी दिशा देणारे आहेत. राज ठाकरेंनी निवडणुकीतील पारदर्शकतेवर बोट ठेवताना फ्रान्ससह जगातील अनेक प्रगत देशांचे दाखले देत बॅलेट पेपरवर मतदान घेण्याचा आग्रह धरला आहे. "मतदान पेटीत टाकल्याचे समाधान मतदाराला मिळाले पाहिजे, हरणे-जिंकणे हा पुढचा विषय आहे," ही त्यांची भूमिका लोकशाहीच्या मूलभूत आत्म्याशी सुसंगत आहे. तसेच, संजय राऊतांच्या 'रेजिम चेंज'च्या दाव्याला दुजोरा देत आगामी दोन-पाच महिन्यांत देशात काहीतरी मोठी राजकीय उलथापालथ होईल, असे भाकीत त्यांनी केले आहे. नीट परीक्षा आंदोलनावरून विद्यार्थ्यांवर झालेला लाठीचार्ज आणि आंदोलकांचा दडपशाहीने झालेला आवाज बंद करण्याचा प्रकार लोकशाहीसाठी घातक असल्याचे सांगत त्यांनी भाजप आणि प्रशासनाला आरसा दाखवला आहे. स्वायत्त संस्थांचे अवमूल्यन, न्यायव्यवस्था, प्रसारमाध्यमे आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर येणारी बंधने या मुद्द्यांवरही राज ठाकरेंनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली. डॉक्युमेंटरी काढण्याच्या किंवा विचार मांडण्याच्या स्वातंत्र्यावर आणली जाणारी मर्यादा आणि 'भाजप स्पॉन्सर' मनोरंजनाचा आग्रह यावर त्यांनी उपरोधिक प्रहार केला. आरएसएसच्या भूमिकेवर भाष्य करताना २०१४ ची सत्ता ही नरेंद्र मोदींच्या लोकप्रियतेमुळे आली, हे सत्यही त्यांनी अधोरेखित केले. एकीकडे तीव्र दुष्काळाचे संकट राज्यासमोर उभे असताना आणि बेरोजगारी-महिन्याचे बजेट कोलमडत असताना, दुसरीकडे राजकीय अस्थिरता आणि व्यवस्थेतील त्रुटींवर बोट ठेवणारे राज ठाकरेंचे हे भाषण म्हणजे आगामी काळातील मोठ्या राजकीय संघर्षाची नांदी ठरत आहे.

जलसुरक्षेच्या दिशेने ठोस पाऊल : टँकरद्वारे पाणीपुरवठ्याला पारदर्शकतेची नवी दिशा



**पाणी हे जीवनाचे मूलभूत अधिष्ठान आहे. मानवी जीवनापासून शेती, पशुधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेपर्यंत प्रत्येक घटक पाण्यावर अवलंबून आहे. पावसाची अनिश्चितता आणि बदलत्या हवामानामुळे निर्माण होणारी पाणीटंचाई ही केवळ नैसर्गिक समस्या राहिलेली नाही, तर प्रभावी नियोजन आणि सुयोग्य व्यवस्थापनाची कसोटी ठरत आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक नागरिकाला आवश्यक प्रमाणात स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, ही प्रशासनाची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. याच भूमिकेतून छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाने टंचाईग्रस्त भागातील टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी सर्वंकष कार्यपद्धती निश्चित केली आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष विनय गौडा जी. सी. यांनी जिल्हास्तरीय पाणी टँकर संनियंत्रण व प्रत्यक्ष पाहणी समिती गठित करून पाणीपुरवठा व्यवस्थेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि अचूकता आणण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ या संभाव्य टंचाई कालावधीचा विचार करून ही कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

गरजेनुसार पाणीपुरवठा, नियोजनाला प्राधान्य

पाणीटंचाईच्या काळात टँकरद्वारे पाणीपुरवठा हा नागरिकांसाठी मोठा आधार ठरतो. मात्र, हा पुरवठा केवळ मागणीवर आधारित न राहता प्रत्यक्ष गरजेनुसार व्हावा, यासाठी प्रशासनाने स्पष्ट निकष निश्चित केले आहेत. संबंधित गावाची किंवा वाडी-वस्तीची लोकसंख्या विचारात घेऊन दरडोई प्रतिदिन २० लिटर पाण्याच्या निकषानुसार आवश्यक पाण्याचे प्रमाण निश्चित केले जाणार आहे. यासोबतच पशुधनाच्या पाण्याची गरजही विचारात घेतली जाणार आहे.

टँकरची मागणी करण्यापूर्वी ग्रामसभेचा अधिकृत ठराव आवश्यक करण्यात आला आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याच्या नियोजनात ग्रामस्थांचा सहभाग वाढणार असून स्थानिक गरजांचे वास्तव चित्र प्रशासनासमोर येण्यास मदत होईल.

तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पारदर्शकतेचा नवा अध्याय

पाणीटंचाई निवारणाच्या व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. प्रत्येक अधिकृत शासकीय अथवा खासगी टँकरवर जीपीएस उपकरण बसविण्यात येणार आहे. त्यामुळे टँकरच्या प्रत्येक खेपेची नोंद, प्रवासाचे अंतर आणि प्रत्यक्ष पाणीपुरवठा यांची पडताळणी करणे शक्य होईल.

टँकरच्या खेपांची डिजिटल नोंदवही ठेवण्यात येणार असून गावात पाणी पोहोचल्यानंतर ग्रामस्तरीय समितीच्या सदस्यांच्या स्वाक्षरीने त्याची खात्री केली जाईल. जीपीएस नोंदी आणि प्रत्यक्ष भरलेल्या पाण्याची पडताळणी केल्याशिवाय टँकरचे देयक अदा केले जाणार नाही.

या व्यवस्थेमुळे शासकीय निधीचा योग्य विनियोग होण्यास मदत होईल. विशेषतः कागदोपत्री नोंदी आणि प्रत्यक्ष पाणीपुरवठा यांतील तफावत टाळण्यासाठी ही कार्यपद्धती उपयुक्त ठरणार आहे.

पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी केवळ टँकरची संख्या वाढविणे पुरेसे नाही. उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण, पुनर्भरण आणि संवर्धनही तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे टँकरची मागणी करणाऱ्या ग्रामपंचायतींना जलपुनर्भरणाच्या उपाययोजनांचे नियोजन करावे लागणार आहे. शिवकालीन पाणी साठवण योजना आणि जलपुनर्भरणाच्या कामांवर भर देण्यात आला आहे.

आजची पाणीटंचाई दूर करतानाच उद्याची जलसुरक्षा निर्माण करणे, हा या निर्णयामागील व्यापक दृष्टिकोन आहे. टँकर ही तात्पुरती गरज असली, तरी जलसंधारण ही भविष्याची शाश्वत गरज आहे. त्यामुळे टंचाई निवारणासोबत जलसंवर्धनाची सांगड घालण्याचा प्रशासनाचा प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरतो.

जलस्रोतांची पडताळणी आणि पाण्याच्या गुणवत्तेवर लक्ष

सार्वजनिक जलस्रोतांची उपलब्धता संपल्याची खात्री केल्यानंतरच टँकर मंजुरीची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यासाठी ग्रामपंचायतीचा ठराव आणि ग्राम महसूल अधिकारी व ग्रामसेवक यांचा संयुक्त पंचनामा आवश्यक असेल.

टँकर भरण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जलस्रोतांची क्षमता, उपलब्धता आणि पाण्याची गुणवत्ता तपासली जाणार आहे. पाणीपुरवठ्याच्या स्रोतापासून गावापर्यंतचे अंतर जीपीएस किंवा गुगल मॅप्सद्वारे निश्चित केले जाणार आहे. अनावश्यक वाहतूक खर्च टाळण्यासाठीही प्रशासनाने स्पष्ट निर्देश दिले आहेत.

पिण्याचे पाणी केवळ उपलब्ध होणे पुरेसे नसून ते सुरक्षित आणि आरोग्यदायी असणेही आवश्यक आहे. त्यामुळे पाण्याची नियमित गुणवत्ता तपासणी, सार्वजनिक वितरण टाक्यांची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे.

प्रत्यक्ष पाहणीमुळे वाढणार उत्तरदायित्व

कोणतीही योजना प्रभावी ठरण्यासाठी तिची काटेकोर अंमलबजावणी आणि नियमित संनियंत्रण आवश्यक असते. याच अनुषंगाने जिल्ह्यात कार्यरत एकूण टँकरपैकी किमान पाच टक्के टँकरची अचानक तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वरिष्ठ अधिकारी टंचाईग्रस्त गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन मंजूर खेपा, प्रत्यक्ष पाणीपुरवठा, जलस्रोतांची स्थिती आणि ग्रामपंचायत स्तरावरील नोंदींची पडताळणी करणार आहेत. त्यामुळे पाणीपुरवठ्यातील संभाव्य अनियमितता रोखण्यास मदत होईल.

या संपूर्ण व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती कार्यरत राहणार आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सदस्य, तर तहसीलदार (नियोजन व आपत्ती व्यवस्थापन) सदस्य सचिव म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. टँकरच्या खेपांमध्ये अनियमितता, बनावट नोंदी किंवा आदेशाचे उल्लंघन आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदारांविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ तसेच भारतीय न्याय संहितेतील संबंधित तरतुदींनुसार कारवाई करण्यात येणार आहे.

लोकसहभागातून शाश्वत जलसुरक्षेकडे

पाणीटंचाई निवारण ही केवळ प्रशासकीय यंत्रणेची जबाबदारी नसून त्यात ग्रामपंचायत, स्थानिक संस्था आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. पाण्याचा काटकसरीने वापर, उपलब्ध स्रोतांचे संरक्षण, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि जलपुनर्भरण यांसारख्या उपक्रमांतून गावपातळीवर जलसुरक्षेचा पाया मजबूत करता येऊ शकतो.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाने निश्चित केलेली ही सर्वंकष कार्यपद्धती म्हणजे केवळ टँकर व्यवस्थापनातील सुधारणा नाही, तर लोकाभिमुख, तंत्रज्ञानाधिष्ठित आणि उत्तरदायी प्रशासनाच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

पाण्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान आहे आणि तो गरजू नागरिकांपर्यंत योग्य वेळी, योग्य प्रमाणात व सुरक्षित स्वरूपात पोहोचणे हीच प्रभावी जलव्यवस्थापनाची खरी कसोटी आहे. या कार्यपद्धतीची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास टंचाईग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा मिळण्याबरोबरच पाणीपुरवठा व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होईल. जलसंधारणातून जलसमृद्धी आणि पारदर्शक व्यवस्थापनातून जलसुरक्षा, हाच शाश्वत भविष्याचा मार्ग आहे.

संजीवनी जाधव पाटील
माहिती अधिकारी* जिल्हा माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर

डॉ .प्रतापसिंह पाटील विजयी होणार-- सलीम इनामदार



हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील मन मिळावु शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेली व्यक्तिमत्व डॉ प्रतापसिंह पाटील हे मराठवाडा पदवीधर मतदारसंघा चे आमदार होणार असे प्रतिपादन लोकश्रेय मित्र मंडळा चे संस्थापक अध्यक्ष सलीम इनामदार यांनी व्यक्त केले या वेळी माजी आमदार विजय गव्हाणे जिल्हाप्रशीषद सदस्य रवी पतंगे डॉ विवेक नावंदर पवार सर नंदु पाटील यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

जिल्ह्यात आजपासून 'शेत वाचवा अभियान' सुरु दि.30 नोव्हेंबरपर्यंत विविध उपक्रम राबविणार

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: जमिनीचे आरोग्य सुधारणे, रासायनिक खतांचा संतुलित वापर वाढविणे, जलसंधारणाला चालना देणे आणि नैसर्गिक व शाश्वत शेतीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या वतीने देशभरात उद्या गुरुवार, दि.22 ऑक्टोबर ते 30 नोव्हेंबर 2026 या कालावधीत 'शेती वाचवा अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत परभणी जिल्ह्यात कृषी विभाग, आत्मा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि कृषी विज्ञान केंद्र, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने विविध जनजागृती, प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

अभियानाच्या माध्यमातून तालुका कृषी अधिकारी कार्यालयांमार्फत गावपातळीवर जलसंधारण, पाण्याचे पुनर्भरण व पाण्याची साठवणूक याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच माती परीक्षणावर आधारित पीक पोषण व्यवस्थापन, मृदा आरोग्य पत्रिकेचा वापर, रासायनिक खतांचा संतुलित वापर, खत विक्रीविषयक नियमांची माहिती आणि एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन यावर भर देण्यात येणार आहे.

एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन

शेतीतील कीड व रोगांचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि कीटकनाशकांचा योग्य व संतुलित वापर याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. 'प्रति थेंब अधिक पीक' या संकल्पनेनुसार पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यास प्रोत्साहन देण्यात येईल. प्रशिक्षण, प्रक्षेत्र भेटी आणि शेतावरील प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून नैसर्गिक, सेंद्रिय व शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार करण्यात येणार आहे.

शेतकरी ओळखपत्र व महिला शेतकरी प्रमाणपत्राबाबत मार्गदर्शन

या अभियानांतर्गत शेतकऱ्यांचा फार्मर आयडी तयार करणे आणि त्यातील माहिती अद्ययावत करण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच महिला सक्षमीकरणाशी संबंधित तरतुदींच्या अनुषंगाने महिला शेतकरी प्रमाणपत्र मिळविण्याबाबतही क्षेत्रीय स्तरावर माहिती देण्यात येणार आहे.

या अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये मृदा संवर्धन, पाणी व्यवस्थापन, खतांचा संतुलित वापर आणि पर्यावरणपूरक शेती पद्धतींबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी गावपातळीवर प्रक्षेत्र भेटी, प्रशिक्षण वर्ग, शेतकरी मेळावे व इतर उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

परभणी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी या अभियानांतर्गत आयोजित प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, शेतकरी मेळावे व जनजागृती कार्यक्रमांचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन 'आत्मा'चे प्रकल्प संचालक दौलत चव्हाण यांनी केले आहे.

केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी

अंधारी : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात यंदा झालेला अपुरा पाऊस, पावसातील प्रदीर्घ खंड आणि त्यामुळे निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई यांमुळे शेतकरी बांधवांसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. पिकांचे नुकसान, वाढ खुंटणे आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न बिकट झाल्याने ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे शहर अध्यक्ष (शासकीय योजना कक्ष) श्री. संतोष केशवराव तायडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन जिल्ह्यात तातडीने दुष्काळसदृश परिस्थितीवर उपाययोजना राबविण्याची आग्रही मागणी केली आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खालावत असून त्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



निवेदनातील मुख्य मागण्या:

नुकसानभरपाई व पंचनामे: बाधित पिकांचे त्वरित पंचनामे करून शासनाच्या नियमानुसार नुकसानभरपाई व आर्थिक मदत देण्यात यावी.

तालुकानिहाय सर्व्हेक्षण: पावसाचे प्रमाण, पिकांची सद्यस्थिती व पाणीटंचाईचा सर्व्हेक्षण करून परिस्थितीचा आढावा घेण्यात यावा.

चारा व पाणी व्यवस्था: जनावरांसाठी चारा छावण्या, चाऱ्याची उपलब्धता आणि पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात.

जलसंधारणास प्राधान्य: पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये शेततळे, नाला खोलीकरण व जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देऊन ठिबक व तुषार सिंचनाला प्रोत्साहन द्यावे.

कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन: बदलत्या हवामानानुसार शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापन व पर्यायी पिकांबाबत कृषी तज्ज्ञांचा सल्ला मिळवून द्यावा.

विशेष योजना व निधी: पात्र शेतकऱ्यांना पीकविमा व इतर शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, तसेच शासनाकडून विशेष निधीची मागणी करावी.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील विद्यार्थी वैभव शिंदे तिघी स्पर्धेत यश

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

सोयगाव,दि.२१ ऑक्टोबर



संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील 12 वी MCVC विद्यार्थी वैभव शिंदे यांनी आज क्रीडा संकुल परभणी येथे झालेल्या विभागस्तरीय मैदानी स्पर्धेत 3000 M, 1500 M आणि क्रॉस कंट्री या तिघी स्पर्धेत यश मिळवला आणि वैभव ची राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झाली आहे त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपराचार्य डॉ.रावसाहेब बारोटे तसेच कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील यांनी अभिनंदन केले. तसेच त्याला मार्गदर्शन डॉ. निलेश गाडेकर प्रा.शेख तौफिक सर यांनी केले.महाविद्यालयातील शिक्षक वृंद डॉ.एस.एल.पाटील, प्रा.रवींद्र जाधव, प्रा.दिपक लिंबे, प्रा. शंकर कानडे, प्रा.शेख तौफिक,प्रा.विनोद चव्हाण, प्रा.स्वाती देशमुख, प्रा.बी.ए. पाटील, प्रा.अनिल मानकर, प्रा.बुदुले , प्रा.योगेश काळे, प्रा. अश्विनी काळे, प्रा.दीपक सर व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले.पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा

दुष्काळावर मात करण्यासाठी जलसंधारणाची कामे गतीने पूर्ण करा : जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्ह्यात जलसंधारणाची कामे लोकसहभागातून व्यापक प्रमाणावर हाती घ्यावीत. दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने आणि प्रत्यक्ष परिणाम दिसतील अशा पद्धतीने कामे करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय दुष्काळ निवारण बैठकीत ते बोलत होते.

बैठकीस अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर, वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. सी. डी. चव्हाण, विभागीय वन अधिकारी सायमा पठाण, मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता दे. वि. केंधळे, कृषि उपसंचालक एस.एम. जाधवर, एस. आर. कुंभार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील पाझर तलाव, गाव तलाव आणि कोल्हापुरी बंधारे यांच्या निर्मितीवेळची जलसाठवणक्षमता, सध्याची क्षमता, साचलेल्या गाळाचे प्रमाण आणि गाळ काढल्यानंतर वाढणारी क्षमता यांची सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच जलसाठ्यांचे पुनर्भरण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचे नियोजनही करावे. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेची शेतकऱ्यांमध्ये व्यापक जनजागृती करून त्यांना गाळ काढून नेण्यासाठी प्रोत्साहित करावे. दुष्काळी परिस्थितीचे आव्हान स्वीकारून या उपक्रमाला लोकचळवळीचे स्वरूप द्यावे, असे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी सांगितले.

जलसाठ्यांमधून गाळ काढताना बंधारे व प्रकल्पांच्या भिंतींना धोका निर्माण होणार नाही, याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. लघुपाटबंधारे प्रकल्पांमधील गाळ काढल्यानंतर प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरल्यास त्यांच्या संरचनेची तपासणी करावी. आवश्यकतेनुसार प्रकल्पांचे संरचनात्मक परीक्षण



(स्ट्रक्चरल ऑडिट) करून खडुे (जलतारा), विहीर पुनर्भरण, संयुक्त बंधारे, सिमेंट नाला बंधारे, कोल्हापुरी बंधारे, नाला खोलीकरण आणि अनगड दगडी बांध यांसारखी कामे नियोजित करण्यात आली आहेत.

व्हीबी-जी रामजी योजनेच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध होईल, अशा पद्धतीने जलसंधारणाच्या कामांचे नियोजन करावे. जिल्हा आकांक्षित जिल्हा असल्याने संबंधित कामांचे अंदाजपत्रक तयार करून त्यांचा पाठपुरावा करावा. अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव यांनी या कामांच्या प्रगतीचा नियमित आढावा घ्यावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

कृषी विभागाने त्यांची नियोजित कामे विहीत कालमर्यादेत पूर्ण करावीत. त्यामध्ये शेततळ्यांची कामे, ढाळीचे बांध व बांधबंदिस्तीची कामे प्रगतिपथावर आहेत. पोकरा योजनेंतर्गत कृषी विभागाचा नियोजन आराखडा पूर्ण झाल्याचे कृषि विभागाने सांगितले.

वन विभागाने रोपवाटिका, चारा उपलब्धता आणि पाणवठ्यांच्या कामांचे नियोजन करताना उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळाचा विचार करावा. रोपवाटिकांसाठी आवश्यक पाणी, उन्हाळ्यातील पाणीपुरवठा आणि इतर गरजांचा विचार करून प्रस्ताव सादर करावेत. दुष्काळ निवारणासाठी सोपविलेल्या कामांकडे गांभीर्याने लक्ष न देणाऱ्या विभागांना नोटीस देण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

पाणीपुरवठा विभागाच्या पुनर्भरणाच्या काही कामांबाबत प्रशासकीय मंजुरीच्या टप्प्यावर अडचणी निर्माण झाल्याचे निदर्शनास आले. ही कामे मार्गी लावण्यासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या विशेष निधीचा वापर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

गोदावरीच्या पाण्याचा उपयोग करून जलस्रोत बळकट करा

जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याचे स्रोत बळकट करण्यासाठी स्वतंत्र नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. गोदावरी नदीत उपलब्ध असलेल्या पाण्याचा विविध माध्यमांतून उपयोग करून जिल्ह्यातील जलसाठे भरून घेण्याच्या शक्यता तपासाव्यात. यासाठी उपलब्ध जलसाठे आणि पाणी साठवणुकीच्या संभाव्य ठिकाणांची ओळख करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी सांगितले.

तसेच प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात घरबांधणी करताना पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण करण्यास प्रोत्साहन द्यावे. जलसंधारणाची कामे केवळ कागदोपत्री न राहता त्यांचे प्रत्यक्ष परिणाम दिसले पाहिजेत. संभाव्य दुष्काळाचा सामना करण्यासाठी सर्व विभागांनी जबाबदारीने कामे पूर्ण करावीत. दुष्काळ निवारणासाठी हाती घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्तरावरही आढावा घेतला जाणार असल्याने विभागांनी कामांना गती द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

केऱ्हाळा फाट्यावर महसूल पथकाची धडक कारवाई; अवैध गौण खनिज वाहतूक करणारा हायवा जप्त!



अजिंठा प्रतिनिधी : सिल्लोड तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि बेकायदेशीर वाहतुकीविरुद्ध महसूल प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. केऱ्हाळा फाटा येथे आज संध्याकाळी महसूल पथकाने कारवाई करत अवैध गौण खनिजाची वाहतूक करणारा हायवा ट्रक ताब्यात घेतला. या कारवाईमुळे अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

सिल्लोड तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी महसूल प्रशासनाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. बेकायदेशीरपणे गौण खनिजाची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर महसूल पथकाने केऱ्हाळा फाटा येथे नाकाबंदी करून संशयित हायवा ट्रक अडवला. वाहनाची तपासणी केली असता आवश्यक कागदपत्रे व वाहतूक परवाना आढळून न आल्याने महसूल प्रशासनाने संबंधित वाहन ताब्यात घेतले. जप्त केलेला हायवा पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी सिल्लोड तहसील कार्यालयात जमा करण्यात आला आहे.

ही कारवाई सिल्लोडचे तहसीलदार सागर वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी मंडळ अधिकारी काशिनाथ ताठे, ग्राम महसूल अधिकारी मुक्तार शहा (केऱ्हाळा), विशाल दूनगहू (आमठाणा), गणराज पल्लवे (घाटनांद्रा), वाल्मिक सुरडकर (निल्लोड), दीपक बागुल (पिंपरी) आणि राजू बनसोड (बोरगाव कासारी) यांच्यासह महसूल कर्मचारी उपस्थित होते.

अवैध वाहतुकीवर कारवाई सुरूच राहणार

सिल्लोड तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू राहील, असा इशारा महसूल प्रशासनाने दिला आहे. शासनाचे नियम धाब्यावर बसवून गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्यांवर महसूल विभागाची करडी नजर राहणार आहे.

वेरूळच्या विद्यासागर गोशाळेतील 135 गायींच्या चाऱ्यासाठी दानशूर व्यक्तींना चाऱ्यासाठी मदत करा डॉक्टर प्रेमचंद पाटणे

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता



खुलताबाद प्रतिनिधी संतोष करपे..श्री क्षेत्र वेरूळच गो शाळेतील १३५ गाईंना पावसाअभावी चाऱ्याची भीषण टंचाई; मुक्या जनावरांचे प्राण वाचविण्यासाठी चारा, कुट्टी व भुसा दान करण्याचे

आवाहन यावर्षी पावसाचे प्रमाण अत्यंत कमी झाल्याने राज्यात चाऱ्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे.याचा फटका वेरूळ तालुका खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथील श्री पार्श्वनाथ आश्रम, गुरुकुल आचार्य विद्यासागर गोशाळेलाही बसला आहे. या गोशाळेत सध्या सुमारे १३५ गायी असून, त्यांच्यासाठी पुरेसा चारा उपलब्ध होत नसल्याने मोठे संकट निर्माण झाले आहे. या मुक्या जनावरांचे प्राण वाचविण्यासाठी दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेऊन चारा, कुट्टी व भुसा दान करावे, असे भावनिक आवाहन संस्थेचे सचिव डॉ. प्रेमचंद पाटणी यांनी केले आहे.

वेरूळ येथील या गोशाळेत सुमारे १३५ गायींचा सांभाळ केला जातो. त्यापैकी केवळ चार गायी दूध देणाऱ्या असून, उर्वरित सुमारे १३१ गायी दूध न देणाऱ्या आहेत. पावसाअभावी परिसरातील डोंगर-दऱ्यांमध्ये जनावरांसाठी चारा उपलब्ध होणे कठीण झाले आहे. त्यामुळे गोशाळेतील गायींच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पुरेशा चाऱ्याअभावी गायींची उपासमार होत असून, त्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे. पाण्याची व्यवस्था केली; मात्र चाऱ्याचा प्रश्न कायम

गोशाळेतील गायींना पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी संस्थेने किमान दोन किलोमीटरपर्यंत खोदकाम करून पाण्याची व्यवस्था केली आहे. मात्र, पाण्याची व्यवस्था झाली असली, तरी चाऱ्याअभावी गायींच्या संगोपनाचा प्रश्न कायम आहे. जनावरांना पुरेसे खाद्य मिळत नसल्याने त्यांची अवस्था बिकट होत चालली आहे. अशा परिस्थितीत गायींचे संरक्षण आणि संगोपन करण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींच्या मदतीची नितांत गरज आहे. चारा दान करून मुक्या जनावरांना द्या जीवदान

गोशाळेतील गायींची उपासमार थांबविण्यासाठी शेतकरी, व्यापारी, सामाजिक संस्था, सेवाभावी संघटना आणि दानशूर नागरिकांनी आपल्या परीने मदत करावी. उपलब्ध असलेला हिरवा किंवा सुका चारा, कुट्टी तसेच भुसा दान करून या मुक्या जनावरांचे प्राण वाचविण्यास हातभार लावावा. संकटाच्या या काळात समाजाने पुढे येऊन गोशाळेला मदत केल्यास गायींच्या चाऱ्याचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागू शकतो.

चारा दान करू इच्छिणाऱ्या दानशूर व्यक्तींनी संस्थेचे सचिव डॉ. प्रेमचंद पाटणी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

रत्नागिरीतील परिषदेसाठी मान्यवर अभ्यासक म्हणून कवी गोपाल इंगळे यांना निमंत्रण



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२१ ऑक्टोबर

सोयगाव तालुक्यातील गलवाडा(अ) येथील युवा कवी, लोकबोली संशोधक व अभ्यासक गोपाल ऋषीदास इंगळे यांची रत्नागिरी येथे होणाऱ्या 'भारतीय अभिजात भाषा परिषद २०२६' साठी मान्यवर अभ्यासक म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या वतीने त्यांना या परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आले आहे.

रत्नागिरी येथे २३ ते २५ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या तीन दिवसीय परिषदेत देशभरातील नामवंत भाषातज्ज्ञ, साहित्यिक, संशोधक आणि अभ्यासक सहभागी होणार आहेत. मराठी भाषा, व्याकरण, साहित्य तसेच अहिराणी आणि खान्देशी लोकबोलीच्या संवर्धनासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन इंगळे यांना निमंत्रण देण्यात आले आहे.गोपाल इंगळे यांनी ग्रामीण बोलीभाषेच्या अभ्यासासह लोकबोलीच्या जतन आणि संवर्धनासाठी योगदान दिले आहे. यापूर्वी त्यांनी मराठवाडा बोलीभाषा विश्वकोश समितीत बोलीभाषा अभ्यासक म्हणून काम केले आहे. त्यांच्या साहित्यिक प्रवासात कविता आणि ललित लेखनाचाही समावेश असून, त्यांचा एक कविता संग्रह आणि एक ललित लेखसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. ग्रामीण भागातून पुढे आलेल्या युवा कवी व बोलीभाषा अभ्यासकाला राज्यस्तरीय परिषदेचे निमंत्रण मिळाल्याने गलवाडा परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

विनापरवाना ट्रॅक्टर पकडून तहसील कार्यालयात जमा



अजिंठा प्रतिनिधी : सिल्लोड शहरासह परिसरात सुरू असलेल्या अवैध गौण खनिज वाहतुकीविरोधात सिल्लोड महसूल प्रशासनाने धडक मोहीम सुरू केली आहे. मंगळवारी सकाळी सुमारे विनापरवाना गौण खनिजाची वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडून पुढील कायदेशीर कारवाईसाठी तहसील कार्यालयात जमा करण्यात आला. महसूल विभागाच्या या सलग कारवायांमुळे अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

सिल्लोड शहरात अवैध गौण खनिज वाहतूक रोखण्यासाठी महसूल विभागाकडून पाहणी सुरू असताना **MH 20 AS 0423** क्रमांकाचा ट्रॅक्टर गौण खनिजाची वाहतूक करताना आढळून आला. महसूल पथकाने ट्रॅक्टर थांबवून चालकाकडे वाहतुकीचा अधिकृत परवाना व आवश्यक कागदपत्रांची चौकशी केली. मात्र, चालकाकडे वैध परवाना तसेच रॉयल्टीची पावती आढळून आली नाही.

चौकशीदरम्यान ट्रॅक्टर चालकाने आपले नाव अशिल सपकाळ, तर वाहनमालकाचे नाव सय्यद वसीम असल्याचे सांगितले. आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्याने महसूल पथकाने ट्रॅक्टर ताब्यात घेऊन तहसील कार्यालय परिसरात जमा केला. या प्रकरणी पुढील कायदेशीर व दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई सिल्लोडचे तहसीलदार सागर वाघमारे आणि मंडळ अधिकारी काशिनाथ ताठे यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

विशेष म्हणजे, अवैध गौण खनिज वाहतुकीविरोधात महसूल विभागाने सोमवारी संध्याकाळीही एका हायवा वाहनावर कारवाई केली होती. त्यानंतर मंगळवारी सकाळी विनापरवाना ट्रॅक्टर पकडण्यात आल्याने प्रशासनाने अवैध वाहतूकदारांविरोधात कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. सलग दोन दिवस झालेल्या या कारवायांमुळे अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

अवैध वाहतूक खपवून घेणार नाही : तहसीलदार

तालुक्यात अवैध वाळू, माती किंवा अन्य गौण खनिजांची बेकायदेशीर वाहतूक कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा तहसीलदार सागर वाघमारे यांनी दिला आहे. अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी महसूल विभागाची धडक मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

मराठवाडा पदवीधर मतदानासाठी मतदारांचा बहिष्कार पदवीधर नितीन जाधव गोगलगावकर

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी



परभणी**मराठवाडा पदवीधर मतदार संघ २०२६ च्या निवडणुका मोठ्या प्रमाणात चालू झालेला आहे पण मराठवाडा पदवीधर मतदार संघ आठ जिल्हे 75 तालुके या मोठा मतदार संघ आहे पण या ठिकाणी अनेक वर्षापासून पदवीधर मतदारसंघातील आमदार लोकं निवडून येतात आणि मग पुन्हा कोणी आलाही कोणीही पदवीधरांना भेटत नाहीत कोण्याही परिधारांचे फोन उचलत नाहीत कोणत्याही परिधारांसाठी कामाला येत नाहीत पदवीधरांच्या साठी त्यांचा मोबाईल नंबर नसतो चालू मग अशा पदवीधरांसाठी जर पदवीधरांनी मतदान केले सर्व उमेदवार हे पदवीधर साठी फक्त निवडणुकीपुरतेच असतात निवडून आल्यानंतर त्यांचे शून्य काम पदवीधरांसाठी केव्हाच कामाला येत नाही म्हणून आम्ही युवा पदवीधरांनी एकच निर्धार केला आहे की येणारी मराठवाडा पदवीधर मतदार संघ 2026 च्या निवडणुकीमध्ये मतदान न करण्याचे निर्णय घेण्यात आला कारण पदवीधरांचे मतदान वाया जात आहे पदवीधर केव्हाच कामाला येत नाही परिसर जनतेचे काम करत नाही म्हणून पदवीधर आमदार बिन कामाचा आहे तर प्रशासनाला सोशल मीडियाच्या आव्हान की पदवीधर आमदारकी ही रद्द करावी कोणताही आमदाराखीची निवडणूक ठेवणे म्हणून आम्ही आता बसूनच बहिष्कार मतदारावर मतदान करणार नाहीत मतदार खूप नाराज आहे सोशल मीडियाच्या माध्यमातून पदवीधर नितीन छगनराव जाधव गोगलगावकर (बीए.एम ए मराठी, मुक्त विद्यापीठ बीएससी ऍग्री) परभणी असे आव्हान सर्व उमेदवारांना करण्यात येत आहे की आम्ही मतदान करणार नाहीत पदवीधर असून पदवीधर मतदार संघाचा हक्क आम्ही बजावणार नाहीत मतदारावर बहिष्कार अशी माहिती मराठवाडा पदवीधर मतदार संघ मतदान बहिष्कार अभियान पदवीधर नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली

सातवा ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सुरू



हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उपासना मंडळ परभणी शहर, च्या वतीने सातव्या ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास सुरुवात प्रारंभ गजानन महाराज मंदिर व महालक्ष्मी मंदिर सभागृह ,स्नेह शारदा नगर वसमत रोड परभणी येथे पारायणाचे नेतृत्व ह भ प दादाराव महाराज भालके ,एकनाथ महाराज पांचाळ, विष्णुसहस्त्रनाम पाठ नेतृत्व विष्णू भक्त बालाजी महाराज तुंगेनवार हे व्यासपीठावर वाचन करत आहेत तर समोरील सहवाचक ज्ञानेश्वरी पारायण भक्त सोपानराव डाळ, रेणुकादास पाचपोर,महिला सहवाचक शीलाताई कदम रेखाताई कदम मालतीताई देशमुख ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजक यादवराव पवार सुधाकरराव देशमुख श्रीमती शीलाताई देशमुख श्रीमती सुनिताताघ पवार यांच्या वतीने दररोज अल्पहार पराण्याकर्त्यांसाठी होणार आहे तरी जास्तीत जास्त संख्येने पारायणासाठी राहिलेल्या दिवसांमध्ये उपस्थित राहावे असे आव्हान श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उपासना मंडळ स्नेह शारदानगर वसमत रोड परभणी चे मुख्य संकल्पक बालाजी महाराज तुंगेनवार, सोपानराव डाळ रेणुकादास पाचपोर माणिकराव राऊत पीजी देशमुख शिवाजीराव झाडे नामदेवराव डाळ मंदिराचे गुरु कालिदास गुरु भोगावकर किशनराव पोपळघट ,खटिंग सर गिराम सर महिला प्रतिनिधी शीलाताई देशमुख सुनिता ताई पवार शीलाताई कदम रेखाताई कदम मालतीताई देशमुख अनुसयाबाई चौके उमरीकर मॅडम यांच्यासह सर्व महिला पुरुष भाविक भक्त प्रश्रम घेत आहेत अशी माहिती श्रीज्ञानेश्वरी पारायण सोहळा उपासना मंडळ प्रचारक गो प्रबोधनकार नितीन जाधव गोगलगावकर, ह भ प सोपानराव डाळ यांनी पत्रकार द्वारे दिली

समर्पण फाउंडेशनच्या माध्यमातून मनातला संकल्प आज सेवेतून साकारला... श्रीरामाच्या पालखीला मिळाला सजवलेला विसावा

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.२१ ऑक्टोबर

सोयगावच्या श्रीराम मंदिराची दसऱ्याची पालखी ही आपल्या गावाच्या श्रद्धेशी आणि परंपरेशी जोडलेली एक सुंदर गोष्ट आहे. दरवर्षी विजयादशमीच्या दिवशी पालखी गावाबाहेरील आपट्याच्या झाडाजवळ पूजनासाठी जाते. गावाने जपलेल्या या परंपरेत सहभागी होण्याचा आनंद प्रत्येकासाठी खास असतो.

याच ठिकाणी पूजनाच्या वेळी पालखी जमिनीवर ठेवावी लागते, ही गोष्ट मनात होती.तिथे पालखी ठेवण्यासाठी नीटनेटकी व्यवस्था करता यावी, या विचारातून श्रीराम पालखी विसावा हा संकल्प पुढे आला.


आजच्या दसऱ्याला त्या संकल्पाच्या दिशेने पहिलं पाऊल टाकता आलं समर्पण फाउंडेशनच्या माध्यमातून आज या ठिकाणी शामियाना उभारून, पालखी ठेवण्यासाठी तात्पुरती टेबलाची बैठक सजवून आणि परिसराची सुंदर मांडणी करून विसाव्याची व्यवस्था केली. आपल्या गावच्या पालखीचं स्वागत मनापासून करता यावं, हीच या तयारीमागची भावना होती.

पालखी त्या सजवलेल्या विसाव्याच्या ठिकाणी आली आणि केलेल्या तयारीला खरा अर्थ मिळाला. आजची ही व्यवस्था पाहून सर्वांना आनंद झाला. तो आनंद पाहताना, या छोट्याशा सेवेसाठी घेतलेले कष्ट सार्थकी लागल्याचं समाधान आम्हालाही मिळाल.

गावासाठी एखादी गोष्ट करायची म्हटलं की सुरुवात अनेकदा अशाच एका साध्या विचारातून होते - इथे थोडी चांगली सोय करता येईल का ? मग त्या विचाराला हातभार मिळतो, तयारी सुरू होते आणि सगळ्यांच्या सहभागातून ते काम उभं राहतं. आजचा दिवस आम्हाला हाच अनुभव देऊन गेला.आज केलेली व्यवस्था तात्पुरती होती. पुढे याच ठिकाणी कायमस्वरूपी, सुबक श्रीराम पालखी विसावा चौथरा उभारण्याची इच्छा आहे. आज मिळालेला प्रतिसाद आणि सर्वांच्या चेहऱ्यावरचा आनंद या पुढच्या कामासाठी नक्कीच बळ देणारा आहे.


आजच्या तयारीत आणि व्यवस्थेत हातभार लावणाऱ्या प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार. वेळ देणारे, प्रत्यक्ष काम करणारे, साहित्याची मदत करणारे आणि या प्रयत्नाला आपुलकीने साथ देणारे सर्वांच्या सहभागामुळे आजचा दिवस आणखी सुंदर झाला.

दत्तराव खेडकर यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर : समर्थनगर भागातील ज्येष्ठ नागरिक दत्तराव हरजी खेडकर यांचे मंगळवारी (दि.२०) वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर सावरगांव-बंगला (ता.जि.हिंगोली) या मूळगावी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्चात्य चार मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. सावरगाव बंगला या गावाचे ते ४ ० वर्षे सरपंच होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्राध्यापक डॉ.गुलाब खेडकर यांचे ते वडील होत.

लिलाबाई चंद्रकांत वैद्य यांचे निधन



बिडकीन प्रतिनिधी लिलाबाई चंद्रकांत वैद्य यांचे आज दि २१ बुधवार रोजी सकाळी ८.४५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले दुपारी चार वाजता अमरधाम स्मशानभूमी शेकटा रोड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले,त्यांचे पश्चात एक मुलगा , सुन , नातवंडे असा परिवार त्या पत्रकार नंदकुमार वैद्य यांच्या मातोश्री होत तर महेश वैद्य , सचिन वैद्य , विकास वैद्य यांच्या आजी होत.

खरवली विभाग शाखेतील आमडोशी येथे 70 वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात संपन्न







बोरघर , माणगांव : बौद्ध धम्माच्या इतिहासातील सुवर्ण दिन म्हणून ओळखला जाणारा 70 वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आमडोशी येथे अत्यंत उत्साहात, शिस्तबद्ध आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. 5 खरवली विभाग व आमडोशी बौद्धजन सेवा संघ, स्थानिक व मुंबई, महिला मंडळ आमडोशी यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक 20 ऑक्टोबर रोजी या भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. 5 खरवली विभागाचे अध्यक्ष विवेक जाधव होते.

सकाळी 10.00 वाजता राजेश शांताराम कासारे अध्यक्ष, स्थानिक भावकी यांच्या शुभहस्ते धम्मध्वजारोहणाने कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात झाली.

बौद्ध उपासक लक्ष्मण मोरे यांनी अत्यंत मंगलमय वातावरणात धम्म संस्कार विधी संपन्न केली.

त्यानंतर अमोल मोहिते सरचिटणीस, राजेश कासारे उपाध्यक्ष, ऑडिटर संतोष मोरे, आणि संदेशवाहक निलेश जाधव यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

अध्यक्ष विवेक जाधव यांनी आपले अध्यक्षीय प्रास्ताविक सादर केले.

तद्नंतर कुमार आरुष नितीन कासारे या छोट्या बालकाने धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि "क्रूर चंड अशोक ते धम्म प्रिय चक्रवर्ती सम्राट अशोक" या ऐतिहासिक विषयावर आपल्या बाल वाणीतून भाषण करून उपस्थितांची मने जिंकली. तद्नंतर प्रमुख मार्गदर्शक पराग जाधव यांनी _"धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे महत्त्व"_ या विषयावर प्रवचन दिले.

दुपारी विशेष सत्कार उपक्रमांतर्गत रायगड भूषण, माणगाव तालुक्यासह खरवली विभागाचा ढाण्या वाघ, बौद्ध समाजाचा बुलंद आवाज, सामाजिक कार्यकर्ते नामदेव कासारे यांना शाखेच्या वतीने सन्मानपूर्वक "खरवली विभाग भूषण" हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तद्नंतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा सत्कार समारंभ आणि गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न झाला. सत्कार समारंभ बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. 5 यांच्या सौजन्याने तर विद्यार्थी गुणगौरव नंदू अशोक कांबळे यांच्या सौजन्याने पार पडला. यामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

दरम्यान दुपारी बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव चे अध्यक्ष रवींद्र मोरे, सचिव रघुनाथ साळवी, कायदेशीर सल्लागार मुंबई उच्च न्यायालयाचे जेष्ठ विधीज्ञ ॲडव्होकेट नरेश जाधव, बुद्धीस्ट इंटरनॅशनल नेटवर्क चे सुर्यकांत कासे, शहर शाखा क्रमांक सहा चे अध्यक्ष निलेश साळवी सचिव अरविंद मोरे इत्यादींचे आगमन झाले. माणगाव तालुक्यातील नाणोरे येथील वर्षावास धम्म प्रवचन मालिका कार्यक्रम पार पाडून तालुका अध्यक्ष रवींद्र मोरे आणि त्यांच्या शिष्टमंडळाने या कार्यक्रमाला आवर्जून लावलेल्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला नव चैतन्य आले. आणि कार्यक्रमाचा उत्साह द्विगुणित झाला. तद्नंतर तालुका अध्यक्ष रवींद्र मोरे यांनी सर्व उपस्थितांना धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा देऊन उपस्थित धम्म उपासक आणि उपासिका यांना संबोधित करुन आगामी कार्यक्रमांच्या आयोजन नियोजन, सहभाग आणि उपस्थिती विषयी अधिसूचना दिल्या.

तद्नंतर भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. दि. यशवंत जयराम कासारे व दि. वैजयंती यशवंत कासारे यांच्या स्मरणार्थ कुमार, शेखर व सागर कासारे यांच्या सौजन्याने भोजन तर दि. गणेश सखाराम मोहिते यांच्या स्मरणार्थ अक्षय गणेश मोहिते यांच्या सौजन्याने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

तद्नंतर रोहित सकपाळ खजिनदार, संतोष बाळाराम मोरे ऑडिटर आणि निलेश मारुती जाधव संदेशवाहक यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

या कार्यक्रमास तालुका सह सचिव रणजित मोहिते, तालुका प्रसिद्धी प्रमुख पत्रकार विश्वास गायकवाड, शाखा क्रमांक आठ अध्यक्ष संदेश साळवी, कृषी विभागाचे परमेश्वर गाडे, भारतीय डाक विभागाचे विनोद जाधव, संतोष कळंबे, महेंद्र कासारे, गौतम कासारे, एडवोकेट अंकेत कासारे, तुषार जाधव, सौरभ जाधव, संपादक अविष्कार गायकवाड इत्यादी मान्यवरांसह आमडोशी बौद्धजन सेवा संघ स्थानिक व मुंबई, महिला मंडळ, बौद्ध सेवा संघ खरवली, संघर्ष महिला मंडळ, बौद्धजन सेवा संघ बोरघर, संघमित्रा महिला मंडळ, बौद्ध सेवा संघ उमरोली, माता रमाई महिला मंडळ, पंचशील मित्र मंडळ बोर्ले, नालंदा बौद्धजन सेवा संघ पेण, पंचशील महिला मंडळ, सारनाथ बौद्ध विकास मंडळ सुरव व इतर सर्व संलग्न मंडळांचे पदाधिकारी व बौद्ध बांधव-भगिनी उपासक आणि उपासिका मोठ्या संख्येने शुभ्र वस्त्र परिधान करून उपस्थित होते.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

घाटीत विजयादशमीनिमित्त रायफल्सचे विधिवत शस्त्रपूजन

सुरक्षा जवानांनी घेतली डॉक्टर, रुग्णांच्या संरक्षणाची प्रतिज्ञा



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे विजयादशमीनिमित्त सुरक्षा जवानांकडून वापरण्यात येणाऱ्या रायफल्सचे विधिवत शस्त्रपूजन करण्यात आले. घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते हे पूजन करण्यात आले. यावेळी सुरक्षा जवानांनी डॉक्टर, रुग्ण तसेच रुग्णालय परिसराच्या संरक्षणाची प्रतिज्ञा घेतली.

घाटी रुग्णालयात दररोज मोठ्या संख्येने रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक येत असतात. रुग्णालयातील डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी, रुग्ण आणि परिसराची सुरक्षा राखण्याची महत्त्वाची जबाबदारी सुरक्षा जवान पार पाडतात. विजयादशमीच्या पार्श्वभूमीवर शस्त्रपूजन करून जवानांनी आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडण्याचा संकल्प केला.

या वेळी अपघात विभागातील महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या कार्यालयात सहसंचालक सुदर्शन मुंडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे, डॉ. मनीष मालानी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे सुरक्षा अधिकारी सुरेश भाले यांच्यासह अन्य सुरक्षा कर्मचारी उपस्थित होते.

बर्दापूरमध्ये बेरोजगारीने घेतला मजुराचा बळी

निराधार मुलीला आर्थिक मदतीची आस..!

अंबाजोगाई : बर्दापूर येथे बेरोजगारीच्या विवंचनेतून उत्तम सरवदे या मजुराने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. त्यांच्या पश्चात एक अविवाहित मुलगी असून, तिची आई दोन वर्षांपूर्वी कर्करोगाने निधन पावली आहे. मुलीला भाऊही नसल्याने वडिलांच्या मृत्यूनंतर ती पूर्णपणे एकटी पडली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित मुलीला शासकीय योजनांमधून आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी. तसेच तिच्या पुनर्वसनासाठी आवश्यक सहकार्य करावे, अशी मागणी होत आहे. संकटात सापडलेल्या या निराधार मुलीला आधार देण्यासाठी प्रशासनाने तातडीने पुढाकार घेण्याची गरज आहे.

समूह नृत्यात शांताबाई दराडे विद्यालयाची दिमाखदार कामगिरी; सार्वजनिक दसरा महोत्सवात द्वितीय क्रमांक



हिंगोली : भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथील विद्यार्थिनींनी सार्वजनिक दसरा महोत्सव समिती द्वारा आयोजित समूह नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. कार्यक्रमाचे आयोजन हॉटेल शिवलीला सेलिब्रेशन्स येथे करण्यात आले होते. रोख रक्कम पाच हजार रुपये व सन्मान चिन्ह देऊन संघाचा सत्कार करण्यात आला. समूह स्पर्धेत महाभारतातील एक नृत्य सादर करण्यात आले. यामध्ये रुद्रिका विनोद घुगे, तन्वी बाळू गव्हाणे, आराध्या सुभाष जरे, श्रावणी गजानन मारकड, नम्रता सागर वैद्य, स्वरा राहुल साखरेकर, धनश्री संजय गुठ्ठे, आरुषी बालाजी पालवे, अंकिता नारायण राऊत, तनिष्का मुरलीधर राऊत, वंशिका ज्ञानेश्वर निरगुडे, हर्षदा वामन कुगावकर, श्रद्धा विठ्ठल साळेगावकर या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. सर्व संघाला अध्यापक संजय गुठ्ठे, श्रीमती संगीता जाधव व श्रीमती शोभा कल्याने यांनी मार्गदर्शन केले.

सर्व विद्यार्थिनींचा व मार्गदर्शक अध्यापक यांचा शाळेत मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे व उपमुख्याध्यापक श्री. अनिल लोळेवार यांनी पुष्पहार घालून सत्कार केला. सत्कार कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ज्येष्ठ अध्यापक संजय कुलकर्णी यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर, सचिव अॅड गयबाराव नाईक व सर्व सन्माननीय संचालक यांनी सर्व संघाचे व मार्गदर्शक अध्यापक महोदयांचे अभिनंदन केले.

व्हेरॉकच्या आंतरशालेय, औद्योगिक क्रिकेट स्पर्धा 6 डिसेंबरपासून

25 ऑक्टोबरपर्यंत प्रवेश अर्ज जमा करण्याचे आवाहन



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : व्हेरॉक समूहाच्या वतीने आयोजित १८ वी व्हेरॉक आंतरशालेय आणि २० वी व्हेरॉक औद्योगिक क्रिकेट स्पर्धेला ६ डिसेंबरपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेची घोषणा सोमवारी (१९ ऑक्टोबर) हॉटेल रामा इंटरनॅशनल येथे करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांसह औद्योगिक क्षेत्रातील क्रिकेटपटूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. या घोषणाप्रसंगी व्हेरॉक समूहाचे कर्मचारी संबंध व सीएसआर विभागाचे प्रमुख सतीश मांडे, जिल्हा क्रिकेट संघटनेचे सचिव शिरीष बोराळकर, सहसचिव करण डोग्रा, कार्यकारिणी सदस्य हेमंत मुळे, निखिल मिटकर, आजीव सभासद विशाल पांडे, विशाल लोळगे, अरुण गुदगे, दीपक जोशी, मनिंदरसिंग कानसा, सय्यद जमशीद, अक्षय गोयल, कर्मवीर लव्हेरा, असीर सिद्दीकी, दिनेश कुंटे, मच्छिंद्र जाधव, सिद्धार्थ भोंगाडे आणि राहुल टेकाळे उपस्थित होते.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या संघांनी प्रवेश अर्ज सय्यद जमशीद (९८२३०१५५५८) किंवा असीर सिद्दीकी (८३२९३०८३४३) यांच्याकडून जिल्हा क्रिकेट संघटनेच्या एन-२ येथील क्रिकेट मैदानावर सायंकाळी ५ ते ७ या वेळेत घ्यावेत. भरलेले अर्ज २५ ऑक्टोबरपूर्वी जमा करणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृत बिऱ्हाडे यांनी केले. स्पर्धा सचिव राहुल टेकाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

महावितरणच्या तीन अधिकाऱ्यांनी स्वतःच्या खर्चातून दिला गरजू कुटुंबांना सौरऊर्जेचा आधार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



शाहूवाडी : आर्थिक परिस्थितीमुळे सौरऊर्जा योजनेचा लाभ घेणे शक्य नसलेल्या तीन गरजू कुटुंबांना महावितरणच्या अधिकाऱ्यांनी मदतीचा हात दिला आहे. 'सेवा पर्व' उपक्रमांतर्गत कोल्हापूर ग्रामीण-१ विभागातील शाहूवाडी उपविभागाच्या अधिकाऱ्यांनी स्वतःच्या खिशातून प्रत्येकी २,५०० रुपये भरून तीन दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) वीजग्राहकांच्या स्मार्ट सोलर योजनेचे कोटेशन भरले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत गरजू कुटुंबांना सौरऊर्जेचा आधार देण्यात आला आहे.

कार्यकारी अभियंता अजित अस्वले, शाहूवाडीचे उपकार्यकारी अभियंता प्रवीण कुंभारे आणि सहाय्यक अभियंता सुलतान शेळके यांनी हे आर्थिक योगदान दिले. बीपीएल वीजग्राहकांच्या सर्वेक्षणादरम्यान तीन कुटुंबांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याचे समोर आले. त्यांना योजनेसाठी आवश्यक असलेली २,५०० रुपयांची रक्कम भरणेही शक्य नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अधिकाऱ्यांनी पुढाकार घेत या कुटुंबांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी मदत केली.

या उपक्रमांतर्गत माणगाव येथील शारदा पांडुरंग जाधव, भेडसगाव येथील सोनाबाई दत्तू पाटील आणि गोंडोली येथील मालुबाई नाना मांगळूलकर या तीन लाभार्थ्यांच्या घरांवर प्रत्येकी एक किलोवॅट क्षमतेची सौरऊर्जा यंत्रणा बसविण्यात येणार आहे. प्रत्येक यंत्रणेची किंमत सुमारे ५० हजार रुपये असून, लवकरच तिची उभारणी करण्यात येणार आहे. सौरऊर्जेमुळे या कुटुंबांना वीजखर्चात बचत करण्यास मदत होणार आहे.

पात्र ग्राहकांनी योजनेचा लाभ घ्यावा

शाहूवाडीचे उपकार्यकारी अभियंता प्रवीण कुंभारे यांनी पात्र वीजग्राहकांनी स्मार्ट सोलर योजनेची माहिती घेऊन तिचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. तसेच, दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता तालुक्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार वीजपुरवठा करावा आणि त्यांच्या अडचणी वेळेत सोडवाव्यात, असे निर्देश कार्यकारी अभियंता अजित अस्वले यांनी सर्व शाखाधिकारी व जनमित्रांना दिले.

टीईटी-सीटीईटी उत्तीर्ण 28 शिक्षकांना आज पदोन्नतीची संधी

नांदेड (प्रतिनिधी): शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) आणि केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) उत्तीर्ण शिक्षकांना पदोन्नती देण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून, नांदेड जिल्हा परिषदेतील पात्र २८ शिक्षकांना गुरुवारी (दि. २२ ऑक्टोबर) समुपदेशनाद्वारे नियुक्ती दिली जाणार आहे. यामध्ये विस्तार अधिकारी (वर्ग-दोन) आणि पदोन्नत मुख्याध्यापक या पदांचा समावेश आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल याचिकेच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या निर्देशांनुसार, टीईटी आणि सीटीईटी उत्तीर्ण पात्र शिक्षकांना तत्काळ नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार नांदेड जिल्हा परिषदेतील २८ शिक्षकांना पदोन्नतीच्या माध्यमातून नियुक्ती देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

डॉ. अनुपम टाकळकर यांना आयएमए महाराष्ट्र राज्याचा प्रतिष्ठेचा पुरस्कार

वैद्यकीय क्षेत्रातील योगदान, सामाजिक आरोग्यसेवा आणि संघटनात्मक नेतृत्वाची दखल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), महाराष्ट्र राज्याच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ त्वचारोगतज्ज्ञ डॉ. अनुपम दुर्गादास टाकळकर यांना प्रतिष्ठेचा 'स्टेट प्रेसिडेंट ॲप्रिसिएशन ॲवॉर्ड' जाहीर झाला आहे. वैद्यकीय क्षेत्रातील योगदान, संघटनात्मक नेतृत्व, सामाजिक बांधिलकी आणि डॉक्टरांच्या हितासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

डॉ. टाकळकर यांनी गेल्या २० वर्षांहून अधिक काळ छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील रुग्णांना त्वचारोगविषयक सेवा दिली आहे. त्वचारोग, केसांचे विकार, केसगळती आणि आधुनिक लेझर उपचार क्षेत्रात त्यांनी विशेष कार्य केले आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्थानिक रुग्णांना प्रगत उपचार उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला.

आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेचे २०२५-२६ या वर्षासाठी अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना त्यांनी वैद्यकीय सेवेला सामाजिक उपक्रमांची जोड दिली. 'आओ गाव चले' या उपक्रमातून पाच गावांमध्ये आरोग्यसेवा पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच 'आयएमए कनेक्ट'च्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, अनाथ मुले आणि विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी विविध सेवाभावी उपक्रम राबविण्यात आले.

वैद्यकीय विद्यार्थ्यांमधील मानसिक ताण, नैराश्य आणि आत्महत्येचा धोका लक्षात घेऊन त्यांनी 'आयएमए साथी' हा मानसिक आरोग्य सहाय्य उपक्रम सुरू केला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना समुपदेशन, मार्गदर्शन आणि मानसिक आधार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. याशिवाय आरोग्य तपासणी शिबिरे, अवयवदान जनजागृती, रस्ता सुरक्षा आणि पूरग्रस्तांना वैद्यकीय मदत अशा उपक्रमांतही त्यांनी सहभाग घेतला. डॉक्टरांच्या व्यावसायिक हितांचे संरक्षण आणि वैद्यकीय क्षेत्रातील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठीही ते सक्रिय आहेत. सध्या ते आयएमए महाराष्ट्र राज्याचे सहसचिव असून, आयएमए मुख्यालयाच्या राष्ट्रीय कायदेविषयक स्थायी समितीचे सदस्य म्हणूनही कार्यरत आहेत. डॉ. टाकळकर यांच्या वैद्यकीय सेवा, सामाजिक कार्य आणि संघटनात्मक नेतृत्वाची राज्यस्तरावर दखल घेतल्याने छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्याच्या वैद्यकीय क्षेत्रात आनंद व्यक्त होत आहे.

'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या महा चंडी हवन सोहळ्याची उत्साहात सांगता

दीड हजारांहून अधिक भाविकांचा सहभाग



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : 'द आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या मराठवाडा नवरात्रोत्सव २०२६ अंतर्गत शाहनूरवाडी येथील त्रिलोकसिंग जबिंदा लॉन्समध्ये आयोजित महा चंडी हवन सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सांगता झाली. छत्रपती संभाजीनगरसह जालना, बीड आणि मराठवाड्यातील दीड हजारांहून अधिक भाविकांनी सहभाग नोंदविला. सोहळ्यात गौपूजन, कन्यापूजन, अश्वपूजन, बटुकपूजन, दांपत्यपूजन आणि सुवासिनी पूजन असे धार्मिक विधी वैदिक मंत्रोच्चारात पार पडले. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांची आकर्षक प्रतिकृती सेट डिझाइनर मुकुंद गोलटगावकर यांनी साकारली होती. भरतनाट्यम शिक्षिका रोहिणी यादव यांच्या विद्यार्थिनींनी सलग तीन दिवस नऊ दुर्गांचे नृत्य सादर करून देवीला नृत्यसेवा अर्पण केली. भक्तिमय सत्संगामुळे वातावरण चैतन्यमय झाले.

माजी महापौर नंदकुमार घोडेले, पालकमंत्री संजय शिरसाट, नगरसेविका शिल्पाताई वाडकर, शोभा बुरांडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. त

बालचित्रकला स्पर्धेत ढोरेगावच्या कुणाल जाधव, सुमेरा शेख यांची चमक

जिल्हास्तरावर दोघांचा गौरव; तालुकास्तरावर सात विद्यार्थ्यांनी पटकावले क्रमांक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धा २०२६ मध्ये ढोरेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले. जिल्हास्तरीय निकालात कुणाल संदीप जाधव याने द्वितीय, तर सुमेरा शब्बीर शेख हिने तृतीय क्रमांक पटकावला. तालुकास्तरीय स्पर्धेतही शाळेच्या सात विद्यार्थ्यांनी यश मिळवत शाळेचा नावलौकिक वाढवला.

स्पर्धेच्या 'क' गटात (इयत्ता पाचवी ते सातवी) कुणाल जाधव याने द्वितीय क्रमांक मिळवून एक हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले. 'ड' गटात (इयत्ता आठवी ते दहावी) सुमेरा शेख हिने तृतीय क्रमांक मिळवत पाचशे रुपयांचे पारितोषिक मिळवले. तालुकास्तरीय स्पर्धेत इयत्ता तिसरी ते चौथीच्या गटात कौसर मोईन शेख हिने प्रथम, तर नयना संतोष कांबळे हिने द्वितीय क्रमांक मिळवला. इयत्ता पाचवी ते सातवीच्या गटात कुणाल जाधव याने प्रथम, तर अनिकेत सोमनाथ पठाडे याने द्वितीय क्रमांक पटकावला. इयत्ता आठवी ते दहावीच्या गटात सुमेरा शेख हिने प्रथम, शामल शंकर शिंदे हिने द्वितीय, तर कल्याणी संदीप जाधव हिने तृतीय क्रमांक मिळवला. या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खलील पटेल, उपाध्यक्ष अशोक कांबळे, सरपंच रजियाबी अयुब पटेल, गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे, शिक्षण विस्तार अधिकारी अनिलकुमार सकदेव, केंद्रप्रमुख सचिन डमाळे, मुख्याध्यापिका अंजली पुऱ्हे, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या यशासाठी मनोज घुले, शंकर राऊत, दिलीप धर्माधिकारी, भाऊसाहेब गाढवे, नीलिमा कुलकर्णी, मुग्धा निमसे, परमेश्वर मस्के, सचिन पाटसकर, शामीर शेख, अली बाकोदा आणि कल्याणी जगताप यांनी परिश्रम घेतले.

गोर-गरीब मुलांना शिक्षण देणे हेच अजिंठा शिक्षण संस्थेचे ध्येय - रंगनाथ काळे

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी



सोयगाव,दि.२१ ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचालित पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे थोर स्वातंत्र्यसेनानी,महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री,माजी खासदार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे माजी उपाध्यक्ष तथा अजिंठा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.बाबुरावजी काळे ऊर्फ अप्पासाहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात मान्यवरांनी बाबुरावजी काळे यांच्या मराठवाड्याच्या विकासातील योगदानाला उजाळा दिला

याप्रसंगी अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे यांनी अप्पासाहेबांच्या आठवणी सांगून मराठवाड्याच्या प्रगतीसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. सोयगाव येथे अप्पासाहेबांच्या नावाने ग्रंथालय उभारण्यात येईल असे आपल्या मनोगतात सांगितले.गोर-गरीब मुलांना शिक्षण देणे हेच अजिंठा शिक्षण संस्थेचे ध्येय आहे.आणि ते पूर्ण करण्याचं काम आम्ही करत आहोतअसे ते म्हणाले. सर्व वक्त्यांनी अप्पासाहेबांच्या कार्याविषयी सखोल विचार मांडल्याबद्दल त्यांनी त्यांचे आभार मानले.

अध्यक्षीय भाषणात ज्ञानेश्वर भांदरगे यांनी बाबूरावजी काळे यांच्याशी असलेल्या आपल्या आठवणी सांगितल्या. ते म्हणाले की,आप्पासाहेबांनी मला ओळख दिली आणि पुढे जाण्याची संधी दिली.आज मी जे काही यश मिळवले आहे, त्यामागे त्यांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद आहेत.त्यांनी मला स्वतःच्या मुलाप्रमाणे प्रेम दिले. बाबुरावजी काळे हे केवळ स्वतः काम करणारे नेते नव्हते, तर इतरांना घडवणारे नेते होते, असे त्यांनी सांगितले.

माजी प्राचार्य डॉ.एजाज शेख 'मराठवाडा मुक्तिसंग्राम व राजकीय क्षेत्रातील योगदान' या विषयावर मार्गदर्शन करताना असे म्हणाले की, बाबुरावजी काळे यांनी विद्यार्थी दशेपासूनच हैदराबाद मुक्तिसंग्रामात सहभाग घेतला. त्यांनी समाजातील विविध घटकांतील लोकांना मदत केली आणि अनेक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम केले.अप्पासाहेबांचे नेतृत्व प्रभावी होते. त्यांनी राजकीय क्षेत्रात विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यांच्या नेतृत्वामुळे मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळाली. मराठवाडा मुक्तिसंग्रामातील त्यांचे योगदान महत्त्वाचे होते. नेतृत्व आणि सामाजिक कार्याच्या बाबतीत त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचा संदर्भ देत अप्पासाहेबांच्या योगदानाचे महत्त्व स्पष्ट केले.

यानंतर डॉ. विनोद बोरसे यांनी 'मराठवाडा मुक्तिसंग्रामातील आप्पासाहेबांचे योगदान' या विषयावर विचार मांडताना बाबुरावजी काळे यांचे जन्म गाव खर्चाने येथे प्रत्यक्ष भेट देऊन तयार केलेली चित्रफीत दाखवून व्याख्यानाची सुरवात केली. तसेच बाबुरावजी काळे यांचे सोयगाव येथील सहकाऱ्यांच्या सोबतीने केलेल्या सत्याग्रहाचा उल्लेख करत तेथील पोलिस मुक्तिसंग्रामाच्या विविध घटनांचा उल्लेख करत त्यांनी सोयगाव येथील झेंडा सत्याग्रह, विविध सभा, जंगल सत्याग्रह, शेंदुर्णी येथील शस्त्र प्रशिक्षण शिबिर आणि वाकोड येथील छावणी यांसारख्या उपक्रमांची माहिती दिली. निजामशाहीविरुद्धच्या आंदोलनात अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी एकत्र येऊन सहभाग घेतल्याचे त्यांनी सांगितले. तसेच उपोषण, विविध नाक्यांवरील आंदोलने आणि हर्सल तुरुंगाशी संबंधित घटनांचाही त्यांनी उल्लेख केला.

प्रमुख पाहुणे द्वारकाभाऊ पाथ्रीकर यांनी अप्पासाहेबांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. मराठवाड्याच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान मोठे असून, त्यांच्या नेतृत्वाची आठवण कायम राहील, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्ह्याचे माजी काँग्रेस अध्यक्ष व छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर भांदरगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून द्वारकाभाऊ पाथ्रीकर, हरिश्चंद्र लधाने, तुकाराम पाटील, सुभाष चौधरी, विलासचन्द्र काबरा, अजिंठा शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी माजी प्राचार्य अशोक नाईकवाडे, माजी प्राचार्य संजय मून, माजी प्राचार्य डी. बी. चौधरी, गुलशन पवार, प्राचार्य डॉ. पंडित नलावडे, प्राचार्य अन्वरसाब नरेगल, प्राचार्य डॉ. शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे,उपप्राचार्य रवी कुमार गोटेड,प्राचार्य डॉ. राजेश यादव, प्राचार्य डॉ. संभाजी वाघमारे,डॉ. एम आर खान, पंकज साबळे, जय सोने आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिल्पा जिवरग यांनी केले. प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. बाबुरावजी काळे यांनी सामाजिक, आर्थिक आणि प्रादेशिक विकासासाठी केलेल्या कार्याची माहिती त्यांनी दिली. डॉ. दिलीप बिरुटे यांनी आप्पासाहेबांचा जीवनपट सादर केला. त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासातून मराठवाड्याच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. प्रफुल देवरे यांनी उपस्थित मान्यवर, वक्ते, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, स्वर्गीय बाबुरावजी काळे महाविद्यालय, अजिंठा आणि स्वातंत्र्यसेनानी उत्तमरावजी पाटील नर्सिंग कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथील प्राध्यापक व यांचे आभार मानले या कार्यक्रमासाठी कर्मऱ्यांनी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911